असा. क्र. ६५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार, डिसेंबर २७, २००५ / पौष ६, शके १९२७

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका


पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९.–मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.** . . . . ५५९–५६५


दिनांक २१ डिसेंबर २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २७ डिसेंबर २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५० चा मुंबई २९. **ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२००५ चा महा. अध्या. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १६ सप्टेंबर २००५ रोजी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २००५ प्रख्यापित केला होता ;



[ **किंमत :** रुपये ९.०० ]

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १६ सप्टेंबर २००५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५१ ची सुधारणा.

**२.** मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ५१ मधील,— १९५० चा मुंबई २९.

(क) पोट-कलम (२) मधील, " मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ या अन्वये रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे " या मजकुराऐवजी, " विभागीय आयुक्ताकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये, " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या " या मजकुराऐवजी, " विभागीय आयुक्ताच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ७१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७१ मध्ये,—

(क) " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण " हा मजकूर जेथे जेथे येत असेल तेथे तेथे, " विभागीय आयुक्त " हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक भेदांसह, दाखल करण्यात येईल ;

(ख) समास टिपेमधील " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे " या मजकुराऐवजी, " विभागीय आयुक्ताकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ मधील अनुसूची ' ब ' ऐवजी नवीन अनुसूची दाखल करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या विद्यमान अनुसूची ' ब ' ऐवजी पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

**" अनुसूची ' ब '**

(कलम ७९ ड पहा)

| कलम (१) | दस्तऐवजाचे वर्णन (२) | किंमत (३) |
|---|---|---|
| १८ | (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज | रु. १०० |
| २२ | (१) कलम १७ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत केलेल्या नोंदींपैकी कोणत्याही नोंदीत केलेला किंवा प्रस्तावित केलेला बदल कळविणे. | रु. १०० |

अनुसूची 'ब'--चालू

| कलम (१) | दस्तऐवजाचे वर्णन (२) | किंमत (३) |
|---|---|---|
| २५ | (१) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात, धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांपैकी कोणत्या धर्मादाय उप आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने कलम १९ किंवा २२ अन्वये चौकशीचे काम चालवावयाचे हे ठरविण्यासाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने धर्मादाय आयुक्ताकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| २९ | मृत्युपत्र व्यवस्थापकाने, अशा मृत्युपत्रान्वये निर्माण केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ३५ | विश्वस्तव्यवस्थेचा पैसा इतर कोणत्याही रीतीने गुंतविण्याकरिता धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीसाठी करावयाचा अर्ज-- | |
| | (अ) गुंतवणूक करावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. ५० |
| | (ब) गुंतवणूक करावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक असेल परंतु, रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. १०० |
| | (क) गुंतवणूक करावयाची रक्कम रु. १५,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत. | रु. १५० |
| ३६ | (१) पुढील गोष्टींसाठी धर्मादाय आयुक्तांची मंजुरी मिळविण्याकरिता करावयाचा अर्ज-- | |
| | (अ) स्थावर मालमत्तेची विक्री करणे, तिची अदलाबदल करणे किंवा ती देणगी म्हणून देणे-- | |
| | (एक) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. ५० |
| | (दोन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. ५,००० पेक्षा अधिक असेल परंतु, रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. १०० |
| | (तीन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. १५,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत ; | रु. २५० |
| | (ब) स्थावर मालमत्ता पट्ट्याने देणे-- | |
| | (एक) वसूल केलेले सरासरी वार्षिक भाडे रु. ५०० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. २५ |

अनुसूची 'ब'—चालू

| कलम (१) | दस्तऐवजाचे वर्णन (२) | किंमत (३) |
|---|---|---|
| | (दोन) वसूल केलेली सरासरी वार्षिक भाडे रु. ५०० पेक्षा अधिक असेल परंतु, रु. १,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. ५० |
| | (तीन) वसूल केलेले सरासरी वार्षिक भाडे रु. १,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत. | रु. १०० |
| | (क) स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठी विश्वस्तांना पुढील बाबतीत प्राधिकृत करणे— | |
| | (एक) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. २५ |
| | (दोन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. ५,००० पेक्षा अधिक असेल परंतु, रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. १०० |
| | (तीन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. १५,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत. | रु. १५० |
| ३६ | (२) कलम ३६, पोट-कलम (१) च्या खंड (अ) किंवा (ब) या अन्वये धर्मादाय आयुक्ताने दिलेली मंजुरी रद्द करण्याकरिता अर्ज. | रु. १०० |
| ३६ | अ (३) पैसा कर्जाऊ घेण्यासाठी विश्वस्ताने करावयाचा अर्ज— | |
| | (एक) कर्जाऊ घ्यावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. २५ |
| | (दोन) कर्जाऊ घ्यावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक असेल परंतु, रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत ; | रु. १०० |
| | (तीन) कर्जाऊ घ्यावयाची रक्कम रु. १५,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत. | रु. १५० |
| ४१ | ब (१) तक्रारीचा अंतर्भाव असलेला, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीने चौकशी करण्यासंबंधी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ४१ | ड (१) विश्वस्ताला काढून टाकण्यासाठी किंवा बडतर्फ करण्यासाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |

अनुसूची 'ब'—चालू

| कलम (१) | दस्तऐवजाचे वर्णन (२) | किंमत (३) |
|---|---|---|
| ४१ ई (१) | कलम ४१ ई (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी द्यावयाच्या तात्पुरत्या निषेधाज्ञेसाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ४७ (१) | कलम ४७, पोट-कलम (१) खालील अर्ज. | रु. १०० |
| ४७ (५) | उच्च न्यायालयाकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ५० अ | योजना तयार करण्यासाठी किंवा तीत फेरफार करण्यासाठी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५१ (१) | कलम ५० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा दावा दाखल करण्याची संमती मिळविण्यासाठी धर्मादाय आयुक्ताकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५५ | निदेशांकरिता न्यायालयाकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५६ अ | अभिप्राय, सल्ला किंवा निदेश यांसाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५९ (३) | एखाद्या बँकेने किंवा व्यक्तीने, आपल्याजवळ जमा असलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या पैशातून अंशदान देण्याविषयी धर्मादाय आयुक्ताने दिलेल्या आदेशाविरूद्ध, राज्य शासनाकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ७० (१) | कलम २०, २२ किंवा २८ खालील धर्मादाय उप आयुक्ताच्या किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताच्या निष्कर्षाविरूद्ध किंवा त्याने कलम ५४, पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या आदेशाविरूद्ध, धर्मादाय आयुक्ताकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ७० अ | कलम ७० अ खालील अर्ज. | रु. १०० |
| ७१ (१) | दावा दाखल करण्यासाठी परवानगी नाकारणाऱ्या, धर्मादाय आयुक्ताच्या निर्णयाविरूद्ध विभागीय आयुक्ताकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ७२ (१) | कलम ४०, ४१, ४१क, ४३ (२) (अ) व (क) किंवा ७० अन्वये, किंवा, एखादी विश्वस्तव्यवस्था अस्तित्वात आहे किंवा कसे व अशी विश्वस्तव्यवस्था सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे किंवा कसे किंवा कोणतीही मालमत्ता अशा विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता आहे किंवा कसे या प्रश्नासंबंधी धर्मादाय आयुक्ताने दिलेल्या निर्णयाविरूद्ध न्यायालयाकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |

**अनुसूची 'ब'**—चालू

| कलम (१) | दस्तऐवजाचे वर्णन (२) | किंमत (३) |
|---|---|---|
| ७२ (४) | कलम ७२, पोट-कलम (२) अन्वये न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूद्ध उच्च न्यायालयाकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ७३ अ | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तीने, या अधिनियमाखालील कार्यवाहीत पक्षकार म्हणून सामील होण्यासाठी करावयाचा अर्ज. | रु. १० |
| | धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडे कोणतीही चौकशी, अपील किंवा इतर कार्यवाही चालविण्यासाठी सादर केलेला मुखत्यारनामा किंवा वकालतनामा. | रु. १० |
| | या अधिनियमाखालील प्रती मिळविण्यासाठी धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडे करावयाचा अर्ज. | रु. ५ |
| | धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास सादर केलेला इतर कोणताही अर्ज किंवा विनंती-अर्ज. | रु. १० .". |

२००५ चा महा. अध्या. ६. **५.** (१) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २००५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कारवाई (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला कोणताही आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली कृती किंवा, यथास्थिती, कारवाई, किंवा काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. ११८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, डिसेंबर २७, २००५/पौष ६, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Public Trusts (Amendment) Act, 2005 (Mah. Act No. XLIX of 2005), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XLIX OF 2005.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 27th December 2005.)*

An Act further to amend the Bombay Public Trusts Act, 1950.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Public Trusts Act, 1950, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Bombay Public Trusts (Amendment) Ordinance, 2005, on the 16th September 2005 ;

Bom. XXIX of 1950. Mah. Ord. VI of 2005.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Fifty-sixth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Bombay Public Trusts (Amendment) Act, 2005.

(2) It shall be deemed to have come into force on the 16th September 2005.

Amendment of section 51 of Bom. XXIX of 1950.

**2.** In section 51 of the Bombay Public Trusts Act, 1950 (hereinafter referred to as " the principal Act "),— Bom. XXIX of 1950.

(a) in sub-section (2), for the words and figures " Maharashtra Revenue Tribunal constituted under the Bombay Revenue Tribunal Act, 1957 " the words " Divisional Commissioner " shall be substituted ;

(b) in sub-section (4), for the words " Maharashtra Revenue Tribunal " the words " Divisional Commissioner " shall be substituted.

Amendment of section 71 of Bom. XXIX of 1950.

**3.** In section 71 of the principal Act,—

(a) for the words " Maharashtra Revenue Tribunal ", wherever they occur, the words " Divisional Commissioner " shall be substituted ;

(b) in the marginal note, for the words " Maharashtra Revenue Tribunal " the words " Divisional Commissioner " shall be substituted.

Substitution of Schedule B to Bom. XXIX of 1950.

**4.** For the existing Schedule B to the principal Act, the following Schedule shall be substituted, namely :—

" SCHEDULE B "
(*See* section 79-D)

| Section (1) | Description of Document (2) | Value (3) |
|---|---|---|
| 18(*1*) | Application for the registration of a public trust. | Rs. 100 |
| 22(*1*) | Report of any change or proposed change in any of the entries recorded in the register kept under section 17. | Rs. 100 |
| 25(*1*) | Application of any person having interest in a public trust to the Charity Commissioner to determine which of the Deputy or Assistant Charity Commissioner shall proceed with an inquiry under section 19 or 22 in regard to any public trust. | Rs. 100 |
| 29 | Application by the executor of a Will for the registration of a public trust created by such Will. | Rs. 100 |
| 35 | Application for permission of Charity Commissioner for investing trust money in any other manner— | |
| | (*a*) where the amount to be invested does not exceed Rs. 5,000 ; | Rs. 50 |
| | (*b*) where the amount to be invested exceeds Rs. 5,000 but does not exceed Rs. 15,000 ; | Rs. 100 |
| | (*c*) in any other case where the amount to be invested exceeds Rs. 15,000. | Rs. 150 |
| 36(*1*) | Application for sanction of the Charity Commissioner for— | |
| | (*a*) sale, exchange or gift of an immovable property— | |
| | (*i*) where the value of the property involved does not exceed Rs. 5,000 ; | Rs. 50 |

SCHEDULE "B"—*contd.*

| Section (1) | Description of Document (2) | Value (3) |
|---|---|---|
| | (*ii*) where the value of the property involved exceeds Rs. 5,000 but does not exceed Rs. 15,000 ; | Rs. 100 |
| | (*iii*) in any other case where the value of the property involved exceeds Rs. 15,000. | Rs. 250 |
| | (*b*) Lease of immovable property— | |
| | (*i*) where the average annual rent recovered does not exceed Rs. 500 ; | Rs. 25 |
| | (*ii*) where the average annual rent recovered exceeds Rs. 500 but does not exceed Rs. 1,000 ; | Rs. 50 |
| | (*iii*) in any other case where the average annual rent recovered exceeds Rs. 1,000. | Rs. 100 |
| | (*c*) Authorising trustees to dispose of immovable property— | |
| | (*i*) where the value of the property involved does not exceed Rs. 5,000 ; | Rs. 25 |
| | (*ii*) where the value of the property involved exceeds Rs. 5,000 but does not exceed Rs. 15,000 ; | Rs. 100 |
| | (*iii*) in any other case where the value of the property involved exceeds Rs. 15,000. | Rs. 150 |
| 36(*2*) | Application for revocation of sanction given by the Charity Commissioner under clause (*a*) or (*b*) of sub-section (*1*) of section 36. | Rs. 100 |
| 36A(*3*) | Application by a trustee to borrow money— | |
| | (*i*) where the amount to be borrowed does not exceed Rs. 5,000 ; | Rs. 25 |
| | (*ii*) where the amount to be borrowed exceeds Rs. 5,000 but does not exceed Rs. 15,000 ; | Rs. 100 |
| | (*iii*) in any other case where the amount to be borrowed exceeds Rs. 15,000. | Rs. 150 |
| 41B(*1*) | Application containing a complaint by a person having interest in a public trust to institute an inquiry. | Rs. 100 |
| 41D(*1*) | Application for removal or dismissal of a trustee. | Rs. 100 |
| 41E(*1*) | Application for temporary injunction for the purposes specified in section 41E(*1*) ; | Rs. 100 |
| 47(*1*) | Application under sub-section (*1*) of section 47. | Rs. 100 |
| 47(*5*) | Appeal to the High Court. | Rs. 100 |
| 50A | Application to the Charity Commissioner for framing or modifying a scheme. | Rs. 100 |

SCHEDULE "B"—*concld.*

| Section (1) | Description of Document (2) | Value (3) |
|---|---|---|
| 51(*1*) | Application to the Charity Commissioner for consent to file a suit of the nature specified in section 50. | Rs. 100 |
| 55 | Application to the court for directions. | Rs. 100 |
| 56A | Application for opinion, advice or direction. | Rs. 100 |
| 59(*3*) | Appeal to the State Government against the order of the Charity Commissioner for the payment of contribution by a bank or person from the money standing to the credit of the public trust with such bank or person. | Rs. 100 |
| 70(*1*) | Appeal to the Charity Commissioner against the finding of Deputy or Assistant Charity Commissioner under sections 20, 22 or 28 or order under sub-section (*3*) of section 54. | Rs. 100 |
| 70A | Application under section 70A. | Rs. 100 |
| 71(*1*) | Appeal to the Divisional Commissioner against the decision of the Charity Commissioner refusing consent to the institution of a suit. | Rs. 100 |
| 72(*1*) | Application to the court against the decision of the Charity Commissioner under section 40, 41, 41C, 43(*2*)(*a*) and (*c*) or 70 or on the question whether a trust exists and whether such trust is a public trust or whether any property is the property of such trust. | Rs. 100 |
| 72(*4*) | Appeal to the High Court against the decision of the court under sub-section (*2*) of section 72. | Rs. 100 |
| 73A | Application by a person having interest in a public trust for joining as a party to proceedings under this Act. | Rs. 10 |
| | *Mukhtyarnama or Vakalatnama* when presented for the conduct of any inquiry, appeal or other proceeding to the Charity Commissioner or the Deputy or Assistant Charity Commissioner. | Rs. 10 |
| | Application to the Charity Commissioner or the Deputy or Assistant Charity Commissioner for copies under the Act. | Rs. 5 |
| | Any other application or petition presented to the Charity Commissioner or the Deputy or Assistant Charity Commissioner. | Rs. 10.". |

Mah. Ord. VI of 2005.

Repeal of Mah. Ord. VI of 2005 and saving.

**5.** (*1*) The Bombay Public Trusts (Amendment) Ordinance, 2005, is hereby repealed.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued),under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई